माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
# माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये प्राप्त झालेले द्वितीय अपील

**अपील क्रमांक : ५०८/२०२२**

**अपिलार्थी** – श्री. अशोक महादेव काकडे

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता-२,**
**नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, सदर, नागपूर**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक अभियंता-१,**
**नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, सदर, नागपूर**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर विभाग ★नागपूर★ सत्यमेव जयते

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २३.०४.२०२४**

| | | |
|---|---|---|
| **अपीलकर्ता** | : | **उपस्थित** |
| **जन माहिती अधिकारी** | : | **उपस्थित** |
| **प्रथम अपिलीय अधिकारी** | : | **उपस्थित** |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा / आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १७.१२.२०२१ | ११.०१.२०२२ | १७.०१.२०२२ | ०८.०२.२०२२ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दि. १७.१२.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "आबाजी थत्ते चरिटेबल ट्रस्ट, जामठा नॅशनल कॅन्सर हॉस्पिटल जामठा, खसरा २४, २५ या जागेवर हॉस्पिटल झाले त्या इमारतीचा नकाशा नोट व नस्तीमधील संपूर्ण कागदपत्राची कॉपी मिळणेबाबत", माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दि. ११.०१.२०२२ रोजीच्या पत्रान्वये, "आपण मागितलेल्या माहितीबाबत मौजा जामठा खसरा क्र. २४, २५ या जागेवर डॉ. आबाजी थत्ते सेवा अनुसंधान संस्था तर्फे National Cancer Institute च्या इमारतीमध्ये अद्ययावत जागतिक दर्जाचे वैद्यकीय उपचार यंत्र लावण्यात आलेले असल्याने, सुरक्षेच्या दृष्टीने येथील कोणतीही माहिती त्रयस्थ पक्षाला देण्यात येऊ नये असे संस्थेचे सचिव श्री. शैलेश जोगळेकर यांनी यापूर्वीच कळविले आहे. करिता आपण मागितलेली माहिती उक्त जागेवर आंतरराष्ट्रीय दर्जाचे National Cancer Institute असून सुरक्षेच्या दृष्टीने अतिशय गोपनीय असल्यामुळे मागितलेली माहिती अपवादात्मक असल्याने माहिती देता येणार नाही", असे अपिलार्थीस कळविले. तदनंतर अपिलार्थी यांनी **दि. १७.०१.२०२२** रोजी कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "मागितलेली माहिती मिळाली नाही" असे कारण नमूद करून प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २७.०१.२०२२ रोजी सुनावणी घेवून दि. ०८.०२.२०२२ रोजीच्या आदेशान्वये, "जन माहिती अधिकारी यांनी दि. १७.०१.२०२२ रोजीच्या पत्रान्वये दिलेली माहिती बरोबर आहे. जन माहिती अधिकारी यांनी शासनाचे परिपत्रक, माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे

कलम ८ (१) ची छायाप्रत व त्रयस्थ पक्षकाराचे आक्षेप अर्जाची छायाप्रत अपिलार्थी यांना सशुल्क मागणीपत्राचा भरणा केल्यानंतर ७ दिवसांच्या आत देण्यात यावी", असे नमूद करून अपील निकाली काढले आहे.

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) नुसार आयोगाकडे **दि. २५.०२.२०२२** रोजी "मागितलेली माहिती मिळाली नाही" असे कारण नमूद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर द्वितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दि. २५.०२.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. त्यावर आज दि. २३.०४.२०२४ रोजी ऑनलाईन पध्दतीने सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी, श्री. अशोक काकडे व्यक्तिश: उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता-२, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, सदर, नागपूर, श्री. आदित्य लोहार ऑनलाईन पध्दतीने उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक अभियंता-१, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, सदर, नागपूर, श्रीमती जागृती झोडे ऑनलाईन पध्दतीने उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरून असे निदर्शनास आले की, अपिलार्थी, श्री. अशोक महादेव काकडे यांनी दि. १७.१२.२०२१ रोजी दाखल केलेल्या जोडपत्र अ नुसार आबाजी थत्ते चॅरिटेबल ट्रस्टची माहिती जन माहिती अधिकारी, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्याकडून मागितली असून आबाजी थत्ते चरिटेबल ट्रस्ट, जामठा नॅशनल कॅन्सर हॉस्पिटल जामठा, खसरा २४, २५ या जागेवर हॉस्पिटल झाले त्या इमारतीचा नकाशा, डिमांड नोट व नस्तीमधील संपूर्ण कागदपत्राची माहिती मागितली आहे. त्यावर तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि. ११.०१.२०२२ रोजी मौजा जामठा खसरा क्र. २४, २५ या जागेवर डॉ. आबाजी थत्ते सेवा अनुसंधान संस्था तर्फे National Cancer Institute च्या इमारतीमध्ये अद्ययावत जागतिक दर्जाचे वैद्यकीय उपचार यंत्र लावण्यात आलेले असल्याने, सुरक्षेच्या दृष्टीने येथील कोणतीही माहिती त्रयस्थ पक्षाला देण्यात येऊ नये असे संस्थेचे सचिव यांनी यापूर्वीच नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना पत्राद्वारे कळविले असून मागितलेली माहिती ही सुरक्षेच्या दृष्टीने अतिशय गोपनीय असून कलम ८ (१) (त्र) च्या तरतुदीनुसार देण्यास नकार देण्यात आलेला आहे. त्याविरुध्द अपिलार्थी, श्री. अशोक काकडे यांनी दि. १७.०१.२०२२ रोजी मागितलेली माहिती मिळाली नसल्याचा आक्षेप नोंदवित प्रथम अपील अर्ज दाखल केला. त्यावर दि. २७.०१.२०२२ रोजी सुनावणी ठेवण्यात आली व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक अभियंता-१, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, सदर, नागपूर यांनी अपिलकर्ता, श्री. अशोक काकडे व जन माहिती अधिकारी, श्री. सचिन पावरे यांची बाजू ऐकल्यानंतर कलम ८ (१) (घ) व (छ) तसेच ८ (१) (त्र) तसेच मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त यांचे दि. २६.०९.२०१३ व दि. २२.१०.२०१३ रोजी जारी केलेले आदेश, त्याअनुषंगाने सामान्य प्रशासन विभाग यांचे दि. २२.१०.२०१४ रोजी जारी केलेले परिपत्रक इत्यादींचा हवाला देत जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद योग्य असल्याचे नमूद केलेले आहे.

त्याविरुध्द श्री. काकडे यांनी मागितलेली माहिती मिळाली नसल्याचा आक्षेप नोंदवित प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज दाखल केलेला आहे. आज झालेल्या सुनावणीत अपिलार्थी, श्री. काकडे उपस्थित असून उपलब्ध असलेली माहिती ही प्रदान करण्याविषयी आग्रही भूमिका घेतली असून ही माहिती व्यापक जनहितार्थ आवश्यक असल्याचे नमूद केलेले आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी कलम ७ (७) अन्वये नमूद केलेली प्रक्रिया राबविली असून कलम ११ (१) अन्वये संबंधित त्रयस्थ पक्षांना वरील माहिती उघड करावी किंवा कसे, याबाबत विचारणा केली असून यातील माहिती ही एका संवेदनशील वैद्यकीय संस्थेशी संबंधित असून यात लावण्यात आलेली आंतरराष्ट्रीय दर्जाची उपकरणे येथे देण्यात येणारे वैद्यकीय उपचार व तेथे दाखल झालेले रुग्ण यांच्या खाजगीपणाचा अधिकार तसेच एकंदरित वरील वैद्यकीय आस्थापनेची सुरक्षितता इत्यादी बाबी लक्षात घेता तसेच कलम ८ (१) (घ), ८ (१) (ड) व ८ (१) (त्र) यातील तरतुदीनुसार तसेच मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त यांचे दि. २६.०९.२०१३, नगर विकास विभाग यांचे दि. १४.१०.२०१३ व महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय यांचे दि. १८.१०.२०२३ रोजीच्या परिपत्रकांचे अवलोकन केले असता जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी घेतलेली भूमिका ही माहिती अधिकार अधिनियमाशी पूर्णतः सुसंगत असून पारित केलेला आदेश हा माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या मुळ तत्वाशी सुसंगत असून अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीत कुठलेच व्यापक जनहित आढळून येत नाही. तसेच कलम ८ (१) (घ), ८ (१) (ड) व ८ (१) (त्र) यातील तरतुदी तसेच मा. सर्वोच्च न्यायालय यांच्या Justice K. Puttaswamy vs Union of India या प्रकरणात खाजगीपणाच्या अधिकाराला

मुलभूत अधिकाराचा दर्जा दिला असून यात दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने पारित दिशानिर्देशांचे अवलोकन केले असता जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी घेतलेली भूमिका ही मूळ माहिती अधिकार अधिनियम व त्यातील सर्व तरतुदी यांच्याशी सुसंगत आढळतात. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पारित केलेला आदेश दि. ०८.०२.२०२२ हा स्वयंस्पष्ट व सम्यक अशा प्रकारचा असल्यामुळे यात हस्तक्षेप करण्याची कुठलीच आवश्यकता नाही. प्रस्तुत प्रकरणी जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी घेतलेली भूमिका ही माहिती अधिकार अधिनियमाच्या मूळ तरतुदीशी सुसंगत असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता, दाखल केलेला द्वितीय अपील अर्ज हा तथ्यहीन असून फेटाळण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

**प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज तथ्यहीन असून फेटाळण्यात येत आहे.**

**(राहुल भा. पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर
सत्यमेव जयते

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : २३.०४.२०२४**

जावक क्रमांक ---4490--- दिनांक ---19 JUL 2024---